Vol 3 Issue 4 Oct 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

## Monthly Multidisciplinary Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-4, Oct-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# विट्गेन्स्टाइन यांचे नीतिविषयक दृष्टिकोन; काही विचार

**सचिन राजपूत , श्रीधर आकाशकर**
विद्यार्थी, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

***सारांश :***तत्त्वज्ञान म्हणजे काय ?किंवा तत्त्वज्ञानाची आवश्यकता आजच्या युगात आहे का ?असा विचार केला असता खालील परिच्छेदावरून या दोन प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न विट्गेन्स्टाइन यांनी सांगितलेल्या नीति विषयक विचारातून केला आहे. विट्गेन्स्टाइन हे विश्लेषणवादी तत्त्वचिंतक असले, तरी त्यांचे नीति, सौंदर्यशास्त्र, धर्म, संस्कृती याबाबत एक वेगळे मत होते. त्यातील नीति बाबतचे त्यांचे विचार यावर फारसे लिखाण भारतात झालेले दिसून येत नाही. मराठीत तर नाहीच नाही. म्हणून हा प्रयत्न या लेखात केला आहे.

***प्रस्तवाना :***

तत्त्वज्ञान म्हणजे 'तत्त्वा'(Principle) चे ज्ञान जाणणे होय. पारंपारिक ग्रीक तत्त्वचिंतक तत्त्वज्ञानाच्या प्रमुखतः तीन उपशाखा मानतात. 1. ज्ञानशास्त्र, 2. सत्ताशास्त्र, 3. नीतिशास्त्र.1

ज्ञानशास्त्रामध्ये ज्ञानाविषयींच्या समस्यांची चर्चा केलेली दिसून येते. जसे की ज्ञान होण्याची साधने कोणती इत्यादी..., तर सत्ताशास्त्रामध्ये अंतिम सत्याच्या बाबतच्या समस्यांची चर्चा केली जाते. म्हणूनच सत्ताशास्त्राला Metaphysics असे इंग्रजीत म्हटले जाते. ॲरिस्टॉटलच्या एका पुस्तकाच्या नावावरून हे नाव या उपशाखेला पडले असावे असे अनेक तत्त्वचिंतक मानतात. Metaphysics याचा अर्थ Meta म्हणजे च्यापलीकडे. तर, physics म्हणजेच भौतिक जगातील असे थोडक्यात म्हणता येईल. मेटाफिजिक्स, म्हणजे, ते, जे भौतिक अनुभव व जगाच्या पलीकडे आहे ते होय. व त्याबाबत असणाऱ्या विविध समस्यांचा विचार या तत्त्वज्ञानाच्या उपशाखेत केला जातो. तिसरी महत्त्वाची तत्त्वज्ञानाची उपशाखा म्हणजे नीतिशास्त्र होय. कोणती कृती योग्य वा अयोग्य हे कसे ठरवणार, त्यासाठी लागणाऱ्या विविध चाचण्या, असलेल्या उपपत्त्या आणि तरी देखील what is good act? असे प्रश्नचिन्ह अनुत्तरीत राहतात. मात्र, या सारख्या नीतिविशयक प्रश्नांची चर्चा नीतिशास्त्रामध्ये केली जाते.

या पारंपारीक तत्त्वज्ञानाच्या उपशाखा सोडल्या तरी तत्त्वज्ञानाच्या इतरही काही शाखा दिसून येतात. जसे, की धर्माचे तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, उपयोजित नीतिशास्त्र हे होय.

काळ परत वेळ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व त्याचे स्वरूप बदलताना दिसते. म्हणजे पारंपारिक ग्रीक तत्त्वज्ञानामध्ये तत्त्वज्ञानाची जी व्याख्या केली होती त्याहून विविध व्याख्या करण्याचा प्रयत्न झालेले दिसून येते. जसे की, कार्ल मार्क्स असे म्हणतो की, what it philosophy is we all ready now, now it is time is change it. मात्र याखेरिज तत्त्वज्ञानाची एक वेगळीच उपशाखा म्हणून किंवा भाग म्हणून सुरू झालेली 19व्या शतकातील चर्चा अर्थात भाशेविषयीची होत. यामध्ये विचार, सत्य (reality) व भाषा या तीन्हीमध्ये काय संबंध असावा किंवा भाषा व तत्त्वज्ञानाचे काय संबंध आहे या विषयीचे विचार मांडणारे तत्त्वचिंतक होऊन गेले. ज्या समस्यांचे विचार करणाऱ्या तत्त्वचिंतकांना विश्लेषणवादी तत्त्वचिंतक असे म्हटले जाते. विश्लेषणवादी तत्त्वचिंतकांमध्ये महत्त्वाचे असे एक नाव म्हणजे विट्गेन्स्टाइन हे होय. विट्गेन्स्टाइन यांनी सांगितलेल्या भाषेविषयक विचार या आगोदर अनेक ठिकाणी मराठीत मासिकांमध्ये प्रकाशित झालेले दिसून येते. मात्र विट्गेन्स्टाइन यांचे नीतिविषयक विचार याकडे दुंलक्ष झाल्याचे दिसून येते. असो, विट्गेन्स्टाइनच्या मते, सामान्यतः नीतिशास्त्राला आचारशास्त्राचे एक रूप मानले आहे. नैतिक विषयांसारखे शुभ, अशुभ, उचित, अनुचित, कर्तव्य इत्यादींची व्याख्या आणि त्यांच्या मापदंडाच्या निर्धारणाचे वर्णन करणे हे नीतिशास्त्राचे मुख्य विषय मानले जाते. या वरील विषयांपेक्षा युक्त नैतिक निर्णयांच्या प्रकृतीचे निर्धारण अधिनीतिशास्त्राच्या अंर्तगत केले जाते. अशाप्रकारे कोणत्या ना कोणत्या प्रकारे नीतिशास्त्र आणि भाषिक अभिव्यक्तीमध्ये आवश्यक संबंध असतो असे विट्गेन्स्टाइन म्हणतात.

सामान्य अवधारणा शिवाय विट्गेन्स्टाइन असे मानतात की नीतिशास्त्र हे पारलौकिक (ट्रान्सेन्डेंटल) आहे. विट्गेन्स्टाइनच्या 'लेक्चर ऑन इथिक्स' या निबंधाचा हाच मुख्य विषय आहे की नीतिशास्त्राची भाशिक अभिव्यक्ती शक्य नसते. 'लेक्चर ऑन इथिक्स' शिवाय 'ट्रैक्टेटस लोजिको फिलॉसॉफिकस' या ग्रंथात सुद्धा विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्र हे पारलौकिक (ट्रान्सेन्डेंटल) आहे असे मानतात. येथे दोन मुद्दे उल्लेखनिय आहे.

1.नीतिशास्त्राची अनभिव्यक्ततेच्या मान्यतेमुळेच विट्गेन्स्टाइन यांनी नीतिशास्त्रावर खूप कमी लिखान केल्याचे दिसते.
2. नीतिशास्त्रीय अनुभूतीच्या भाषिक अभिव्यक्ततेच्या संभावनेला अस्विकार करून विट्गेन्स्टाइन व्यक्तिगत जीवनात नैतिक व्यवहारांच्या आदर्शवादी शुद्धतेच्या स्वरूपामध्ये विश्वास ठेवतात.

'लेक्चर ऑन इथिक्स'या ग्रंथाच्या शेवटी विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राला मानवीय मस्तिष्काची एक प्रवृत्ति असल्याचे मानतात आणि म्हणतात की याचे स्वागत करण्यापासून ते स्वतःला थांबवू शकत नाही. नीतिशास्त्राची अनभिव्यक्ततेच्या याच मान्यतेच्या आधारावर विट्गेन्स्टाइन मानतात की, जसे आपण तर्कशास्त्र किंवा तत्त्वमीमांसा विशयी विचार–विमर्श करू शकतो तसे आपण नीतिशास्त्राविषयी विचार–विमर्श करू शकत नाही.

या लेखात आपण विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राला अनभिव्यक्तता का मानतात?या विशयावर चर्चा करणार आहोत. 'लेक्चर ऑन इथिक्स' मध्ये या निष्कर्षावर पोहचण्यासाठी विट्गेन्स्टाइन आपल्या व्याख्याणाची सुरूवात जी. ई. मूर यांच्या नीतिशास्त्राच्या परिभाषेतून करतात, त्यांच्या मतानुसार नीतिशास्त्र, शुभच्या विषयी सामान्य अन्वेशण आहे. विट्गेन्स्टाइनने जी. ई. मूरच्या नीतिशास्त्र परिभाषेचा स्विकार केला असला, तरीही, ते असे मानतात की, मूरची परिभाषा मर्यादित असल्या कारणामुळे नीतिशास्त्राच्या एकाच पक्षाची विशेष मांडणी मूरने केलेली आहे. विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राच्या अर्थाला मूर पेक्षा अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते नीतिशास्त्राबरोबर सौंदर्यशास्त्राचाही समावेश त्यामध्ये केला जाऊ शकतो. त्यानुसार नीतिशास्त्राची स्पष्ट अशी परिभाषा देण्याची आवश्यकता नाही, कारण ते वस्तूतः अनभिव्यक्त आहे. नीतिशास्त्राला अनभिव्यक्त मानल्यामुळे विट्गेन्स्टाइन विभिन्न सम्प्रत्यय आणि उदाहरणांच्या आधारे नीतिशास्त्राच्या स्वरूपाला स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार विभिन्न सम्प्रत्यय आणि उदाहरणांनी युक्त अशी परिभाषा वस्तूतः एकमेकांची पर्यायवाची आहे. तरी पण, त्यांच्यात नीतिशास्त्राची मूलभूत विशेषणांची माहिती होत नाही. अशाप्रकारे, 'लेक्चर ऑन इथिक्स' मध्ये विट्गेन्स्टाइनद्वारे सांगितलेल्या नीतिशास्त्राच्या परिभाषा खालील प्रमाणे आहे.

'नीतिशास्त्र हे जे मुल्यवान आहे त्याचे अन्वेशण आहे
नीतिशास्त्र हे जीवनाच्या अर्थाचे अन्वेशण आहे.
नीतिशास्त्र हे जे वस्तूतः महत्त्वपूर्ण आहे त्याचे अन्वेशण आहे.
नीतिशास्त्र हे जे जीवनाला जगण्या योग्य बनवते त्याचे अन्वेशण आहे.
नीतिशास्त्र हे उचित जीवन पद्धतीचे अन्वेशण आहे.'

अशाप्रकारे, विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार नीतिशास्त्र हे जे मूल्यवान आहे, वस्तूतः महत्त्वपूर्ण आहे, जे जीवन मुल्यांशी संबंधीत आहे, जे जीवनाला जगण्या योग्य बनवते आणि उचित जीवन पद्धती आहे, त्यांचे अन्वेशण आहे.

नीतिशास्त्राच्या वरील परिभाशा या अर्थात एकमेकांची पर्यायवाची

आहे, की हे सर्व नीतिशास्त्राला अशा सत्तेच्या माध्यमाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते की जे निप्राकृतिक आणि अतिक्रामी आहे. यांच्यात उभयनिष्ठ हे विशेषण नीतिशास्त्राचे प्रमुख आणि आधारभूत विशेषण आहे. या परिभाषांच्या आधारे नीतिशास्त्राला परिभाषेत करने अशा प्रकारे आहे, जसे विभिन्न गोष्टींच्या आधारे विधानाला परिभाषेत करने. कोणत्याही अमूर्त वस्तुला परिभाषित करने हे तत्त्वज्ञानिक समस्यांच्या अथवा आलोचनांच्या पलीकडे नसते. र्निप्रकृतीवाद, संवेगवाद, परामर्शवाद इत्यादि सिद्धांत परस्पर आलोचना–प्रत्यालोचनाद्वारे विकसीत झालेले आहेत. आणि सगळ्याांमध्ये नैतिक अभिव्यक्तीचा कोणत्या न कोणत्या अशा पक्षावर जोर दिला गेला आहे की यांच्यातील कोणाचेही पूर्णपणे निराकरण केले जाऊ शकत नाही. विट्गेन्स्टाइनचे नीतिशास्त्र विषयीच्या वरील व्याख्यांमध्ये या सिद्धांतांचे रूप मिळू शकते. विशेश रूपात विट्गेन्स्टाइनचे नीतिशास्त्राविशयक दृष्टीकोनाला जी. ई. मूरच्या र्निप्रकृतीवादी अथवा अन्तःप्रज्ञावाद आणि ए. जे. एअरच्या संवेगवादाच्या संदर्भात परिभाषीत केले जावू शकते. परंतु, वस्तुतः न ते र्निप्रकृतीवादी अथवा अन्तःप्रज्ञावाद आहे, आणि न संवेगवादी आहे. विट्गेन्स्टाइन कोणत्याही नीतिशास्त्रीय सिद्धांताची स्थापना करत नाही. विट्गेन्स्टाइन द्वारे वरील ज्या परिभाषा सांगितल्या गेल्या आहेत, त्या वास्तवात परिभाषा नसून नीतिशास्त्राविषयी अशी विधाने आहे जी नीतीशास्त्राच्या प्रकृतीकडे संकेत करतात. यांच्याद्वारे पारंपारीक–सादृश्यतेच्या सम्प्रत्ययाद्वारे विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राच्या प्रकृतिला स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. ते नीतिशास्त्राची  अशी कोणतीही विशिष्ट परिभाषा देत नाहीत.

अशाप्रकारे, वरील परिभाषांना नीतिशास्त्राच्या परिभाषेच्या जागेवर नीतिशास्त्राविषयी अभिव्यक्ति म्हणणे अधिक उपयुक्त होईल. या अभिव्यक्तिंचे दोन पैलू आहेतः एका अर्थाने या परिभाषा आहेत, आणि दुसऱ्या अर्थाने नीतिशास्त्राच्या स्वरूपाचे ते संकेत मात्र आहे. या दोन अर्थांचे पुढील प्रमाणे प्रयोग केले गेले आहेः 1. सापेक्ष अर्थ आणि 2. निरपेक्ष अथवा नीतिशास्त्रीय अर्थ.

सापेक्ष अर्थाच्या दृष्टीने कोणत्याही वस्तू किंवा घटनांना चांगले किंवा शुभ हे त्यांच्या व्यवहारीक प्रासंगिकतेच्या आधारावर म्हटले जाते. उदा. – आपण एखाद्या वस्तूला तेव्हा चांगले म्हणतो जेव्हा ती वस्तू आपल्या उद्दिष्टांना पूर्ण करू शकते. किंवा आपण अशा रस्त्याला चांगले म्हणू की जो रस्ता आपल्याला चांगली सुविधा पुरविल. पण या स्थितीपेक्षा जर भिन्न परिस्थिती आढळून आली तर त्या घटना किंवा वस्तूला आपण अशुभ अथवा वाईट म्हणू शकतो. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार या अर्थात शुभच्या सम्प्रत्ययाचा प्रयोग, वास्तवात, नीतिशास्त्रीय नाही आहे. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार, ''त्यांचा (शुभ, चांगले आणि उचिताचे) प्रयोग नीतिशास्त्र अशाप्रकारे करत नाही.''[2] येथे विट्गेन्स्टाइनचे तात्पर्य असे आहे की नीतिशास्त्रामध्ये शुभ अथवा उचित या सारखे सम्प्रत्ययांचा प्रयोग भौतिक उद्दिष्टांना लक्षात ठेऊन केले जात नाही, तर शुभ अथवा उचित जसे सम्प्रत्ययांत कांटची सार्वभौमिकता असणे अनिवार्य असते. सापेक्ष अर्थात कोणतीही समस्या उत्पन्न होत नाही कारण यांचे अर्थक्रियावादी मूल्यच त्यांच्या सत्यपणाचा आधार असतो. निरपेक्ष अथवा नीतिशास्त्रीय अर्थात शुभचे निर्धारण कोणत्याही उद्देशाच्या पूर्तिच्या आधारावर नसते, जेव्हाकी कोणत्याही वस्तूला शुभ, उचित किंवा चांगले म्हटले जाते ते त्याच्या अर्थक्रियावादी प्रयोजनाने निरपेक्ष असते असे म्हटले जाते.

याला विट्गेन्स्टाइन एका वेगळ्याा उदाहरणाद्वारे स्पष्ट करतात. समजा 'क' व्यक्ती टेनिस खेळत आहे, परंतु तो व्यवस्थित खेळत नाहीये. तर 'ख' नावाची व्यक्ती त्याला म्हणतो की तू व्यवस्थित खेळत नाहीये. त्याच्या या उत्तरास 'क' व्यक्ती म्हणतो की, मला माहित आहे की मी व्यवस्थित खेळत नाही; परंतु मला या पेक्षा चांगले खेळायचे नाही. अशा परिस्थितीत 'ख' व्यक्ती फक्त एवढेच म्हणू शकतो की, ओह! मग ठीक आहे. येथे याच्या पेक्षा भिन्न स्थितिची कल्पणा करा; समजा, 'क' व्यक्ती 'ख' व्यक्तीला कोणत्यातरी विषयाबद्दल खोटे बोलत आहे. मग 'ख' व्यक्ती म्हणतो की तुझा व्यवहार चांगला नाही आहे. आता 'क' व्यक्ती म्हणतो की, मला माहित आहे की माझा व्यवहार चांगला नाहीये, परंतु मला या पेक्षा चांगला व्यवहार करायचा नाही. अशा परिस्थितीत 'ख' व्यक्ती असे म्हणू शकत नाही की, ओह! मग ठीक आहे. तो निच्छीत स्वरूपात 'क' व्यक्तीला सांगेल की तुला चांगला व्यवहार करायला पाहीजे. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार व्यवहाराच्या संबंधीत निरपेक्ष मूल्याचा निर्णय नैतिक आहे. जे की टेनिस या खेळासंबंधी उदाहरणात सापेक्ष मूल्याचा निर्णय पूर्णतः तथ्यात्मक आहे की ज्यामध्ये कोणतेही नैतिक तत्व नसते. समजा कोणत्याही व्यक्तीचा व्यवहार चांगला नसला तर नैतिक दृश्टीने त्याची भर्त्सनाच होते परंतु कोणत्याही तथ्यात्मक वस्तुच्या विषयी असे म्हटले जात नाही, जसे कोणी खराब खेळत असेल तर कोणालाही त्याची आपत्ति होत नाही.

अशाप्रकारे, विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार सापेक्ष मूल्याचा निर्णय अंतिमतः तथ्यात्मक असते, तर निरपेक्ष मूल्यांचा निर्णय अर्थात नैतिक निर्णयांमध्ये तथ्यात्मकता असत नाही. दुसऱ्या शब्दात, तथ्यांमध्ये मूल्य असत नाही आणि मुल्यांमध्ये तथ्य असत नाही. तथ्य आणि मूल्यांत विभाजनेच्या स्थापनेला विट्गेन्स्टाइनने नीतिशास्त्राची अव्यक्ततेच्या सिद्धीसाठी एक आधार म्हणून प्रयोग केलेला आहे. या युक्तीच्या अनुसार केवळ तथ्यात्मक निर्णयच वर्णनात्मक असतात किंवा नीतिशास्त्राचा संबंध तथ्यात्मक निर्णयांशी नसते. सापेक्ष मूल्यांचे निर्णय तथ्यात्मक किंवा वर्णनात्मक असतात, जेव्हाकी नैतिक मूल्यांची अभिव्यक्ति शक्य नसते. नैतिक मूल्यांचे अव्यक्त होण्याचे कारण हे आहे की, कोणतेही तर्कवाक्य निरपेक्ष अथवा नैतिक मूल्यांना व्यक्त करू शकत नाही. आणि ज्याला व्यक्त केले जाऊ शकते ते कोणत्याही प्रकारे निरपेक्ष अथवा नैतिक मूल्य असू शकत नाही. शब्द हे केवळ तथ्यांना अभिव्यक्त करतात, ज्याचे अस्तित्व जगात सापडले जाते, जेव्हाकी नीतिशास्त्र हे लोकातीत असतात.

विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार तथ्यांचा आणि तर्कवाक्यांचा संबंध सापेक्षिक मूल्य, थोडक्यात सापेक्षित शुभ आणि सापेक्षित उचिताशी असतो. ज्याच्या विषयी विचार करू शकतो अथवा ज्याच्या विशयी आपण काही बोलू शकतो ते नैतिक मूल्य असू शकत नाही.

निरपेक्ष मूल्यांची अथवा नैतिक मूल्यांची भाशिक अभिव्यक्ति शक्य नाही आहे कारण ते मूल्य लोकातीत असतात. यांची अभिव्यक्ति अध्यात्मिक अनुभवांमध्ये असते. अशा तीन अनुभवांचा उल्लेख विट्गेन्स्टाइनने खालीलप्रमाणे 'लेक्चर ऑन इथिक्स'मध्ये केलेला आहे.[3]

1. जगताच्या अस्तित्वावर आश्चर्याचे रहस्यात्मक अनुभव.
2. काही झाले तरी मी सुरक्षित आहे आणि मला काहीही होऊ शकणार नाही, याचा आध्यात्मिक अनुभव.
3. पश्चातापाचा अनुभव – ईश्वराद्वारा आपल्या कोणत्याही निश्चित आचरणाला अस्वीकार केला जाण्याचा अनुभव.

सामान्यतः अशा स्थितिमध्ये आश्चर्य होते जेव्हा कोणती वस्तू किंवा घटना ही आपल्या आशेच्या विपरीत अस्तित्वात येते किंवा अस्तित्वापासून गायब होते. उदाहरणासाठी, कोणत्याही व्यक्तीला तेव्हा आश्चर्य होईल जेव्हा तो त्याच्या मित्राच्या डोक्यावर शिंगे आले असल्याचे पाहील. आश्चर्य उत्पन्न करणारी वस्तू ही अभौतिक पण असू शकते. जसे की, एखाद्या व्यक्तीच्या कोणत्यातरी विशेष व्यवहारावर तेव्हा आश्चर्य होते जेव्हा त्याचा व्यवहार नेहमी पेक्षा भिन्न स्वरूपाचा असेल. कारण असा व्यवहार समोरच्या व्यक्तीच्या आशेच्या विपरीत असतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूची बातमी कळाल्यावरही आश्चर्य होते. कोणतीही वस्तू किंवा घटनेपासून उत्पन्न होणारे आश्चर्य तितकेच अधिक असते जितके त्याच्या अस्तित्वात येणे किंवा अस्तित्वातून गायब (विलुप्त) झालेली घटना ही पुर्वापेक्षीत नसते. याच्या व्यतिरिक्त अशी वस्तू किंवा घटना की ज्याच्या अस्तित्वात येणे किंवा कमी होणे हे पुर्वापेक्षित असते, हे आश्चर्याचा विषय होऊ शकत नाही. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार, ''असे म्हणणे पूर्णपणे शुभ आणि स्पश्टतः अर्थपुर्ण आहे की मी कोणत्या वस्तुस्थिति विशयी आश्चर्य करतो. आपण सगळे समजतो की, असे म्हणण्याचा काय अर्थ आहे की, मी अशा कुत्र्याच्या आकारावर आश्चर्य करतो की ज्याला मी भूतकाळात पाहीले आहे आणि जो त्यांच्यात सगळ्यात मोठा आहे. किंवा कोणतीही वस्तू, जे शब्दाच्या सामान्य अर्थात असाधारण असले, (पण आश्चर्य करण्याचा अभिप्राय सहजपणे समजले जाऊ शकते). प्रत्येक स्थितिमध्ये मी कोणत्याही अशा वस्तूस्थितीवर आश्चर्य करतो की ज्याच्या अनुपस्थितीला समजले जाऊ शकते. मी या कुत्र्याच्या आकारावर आश्चर्य यामुळे करतो की, कारण मी एक अशा कुत्र्याचे, अर्थात साधारण आकाराच्या कुत्र्याविषयी मी विचार करू शकतो, ज्यावर मी आश्चर्य करणार नाही. असे म्हणणे की, 'मी अमुक स्थितीवर आश्चर्य करतो' केवळ तेव्हा अर्थपूर्ण आहे जेव्हा मी त्या स्थितीच्या अनुपस्थितीची कल्पना करू शकतो. या अर्थात, कोणती व्यक्ती, उदा– असे घर पाडले गेले असल्याच्या कल्पणेवर आश्चर्य करतो की जे घर त्याने अगोदर पाहिले असेल आणि खूप दिवसातून त्या ठिकाणी गेलेला नसेल. पण असे म्हणणे अर्थहीन आहे की जगताच्या अस्तित्वावर आश्चर्य करतो, कारण मी याच्या अनस्तित्वाची कल्पणा करू शकत नाही.''[4] अशाप्रकारे आश्चर्य उत्पन्न होण्याचे वरील उदाहरणांच्या विपरीत जगताच्या अस्तित्वाविषयी आश्चर्य होण्याचे विशेष असे आहे की यांच्यात आश्चर्याच्या अनुभूतीचे साधारण तत्व उपलब्ध नसते. जगताचे अस्तित्व न आशेच्या विपरीत अस्तित्वात येते आणि न ही आशेच्या विपरीत गायब होते. अशाप्रकारे, जगताच्या अस्तित्वावर आश्चर्याची अनुभूती ही विशिष्ट अनुभूती आहे. आश्चर्याची ही अनुभूती साधारण अनुभवांशी भिन्न विशिष्ट प्रकारची रहस्यात्मक अनुभूती आहे.

दुसऱ्या प्रकारचा नैतिक मूल्याचा हा अनुभव पूर्णतः सुरक्षीत असण्याचा अनुभव आहे. सामान्यतः भौतिक जगामध्ये सुरक्षीत होण्याचा अनुभव कोणत्या ना कोणत्या दुर्घटना किंवा आपत्ती पासून वाचून राहण्याचा अनुभव असतो. आपल्या देशात किंवा समाजामध्ये राहिल्यावर विशिष्ट सुरक्षीतेची अनुभूती जे की अन्य देशात किंवा समाजात मिळू शकत नाही. घरात राहण्याची अनुभूती, रस्त्यावर दुर्घटनेपासून वाचून राहण्याची सुरक्षतेची अनुभूती हे या भौतिक जगातल्या

सुरक्षतेच्या अनुभूतीचे उदाहरण आहेत. सुरक्षीत होण्याच्या या उदाहरणातून असे स्पष्ट होते की, ' सुरक्षीत रहाणे' हे तेव्हा अर्थपूर्ण होते जेव्हा सुरक्षा तुटुन जाण्याची शक्यता असते. असे होऊ शकते की, एखाद्याला वाटत असेल की आपण स्वदेशातही असुरक्षीत आहोत, आपल्या घरात राहत असूनही सुरक्षतेच्या अनुभूतीचा अंत व्हावा, किंवा असे वाटते की अप्रत्याक्षित आलोचनेचा सामना करावा लागेल. असुरक्षिततेचा संभावना ही सुरक्षिततेच्या सम्प्रत्ययाला अर्थ प्रदान करते. सुरक्षित राहण्याच्या या उदाहरणांनी भिन्न पूर्णतः सुरक्षित राहण्याच्या अनुभूतीमध्ये सुरक्षेच्या कोणत्याही अपवादाला कोणतेही स्थान नसते. अशा कारण पूर्णतः सुरक्षित होण्याचा विचार भाषीक दृष्टीने अर्थपूर्ण नाही कारण भौतिक जगतामध्ये अशा सुरक्षतेची कल्पनासुद्धा केली जात नाही ज्याचा की अपवाद नसेल. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार, '' 'सुरक्षित होण्या'चा मूळ रूपाने अर्थ आहे की, भौतिक रूपाने हे असंभव आहे की काही निश्चित वस्तू माझ्या बरोबर घटीत होतात आणि यामुळे असे म्हणणे अर्थहिन आहे की काहीही घटीत झाले तरी मी (पूर्णतः) सुरक्षित आहे.''[5] जेव्हा कोणी म्हणतो की तो कोणत्याही विशिश्ट खतऱ्यापासून सुरक्षित आहे, तर त्याचा तात्पर्य एक विशिष्ट देश–काळामध्ये कोणत्याही प्रकारच्या नुकसानापासून वाचने असते. यामुळे असे म्हणणे आहे की, 'मी सुरक्षित आहे, काही झाले तरी, मला कोणतेही नुकसान होऊ शकत नाही' हे अर्थहिन अभिव्यक्ति आहे. या अभिव्यक्तिचा कोणताही अर्थ नाही, तरीपण, याची आध्यात्मिक किंवा रहस्यात्मक अनुभूती नाकारली जाऊ शकत नाही. या आध्यात्मिक किंवा रहस्यात्मक अनुभूतीचे अनेको उदाहरण आपल्याला सहज ही उपलब्ध होतात.

तीसऱ्या प्रकारची नैतिक मूल्याची अनुभूतीच्या उदाहरणाच्या रूपात विट्गेन्स्टाइन पश्चातापाच्या अनुभूतिचा उल्लेख करतात. विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार पश्चातापाच्या अनुभूतिचे वर्णन ईश्वराद्वारे आपल्या आचरणला अमान्य केले जाणाऱ्या रूपामध्ये केले जाते. पश्चातापाची अनुभूती पण वरील दोन्ही अनुभूतींसारखीच नैतिक मूल्याची अनुभूती आहे. निश्चित रूपाने ही अनुभूती साधारण अनुभवाची अनुभूती नाही आहे. ही कोणतेही कर्म करणाची निशेधानुभूति आहे. पश्चातापाची अनुभूती या अर्थामध्ये नैतिक मूल्याची अनुभूती आहे की यामध्ये मनुष्यांच्या नैतिकतेच्या भावनेनुसार आचरण न करू शकल्या कारण विशाद–ग्रस्त असतो. या अनुभूतीचे कोणी बाह्य उद्दीपक नसतो, जसे की सामान्य इंद्रियानुभवामध्ये असतो. पश्चाताप मनुष्याच्या अंतकरणाचा आवाज असतो. परंतु पश्चातापाच्या अनुभूतिचे वास्तविक वर्णन आपली भाषा करू शकत नाही. कारण ज्या प्रकारच्या तथ्यांचे वर्णन केले जाते, ते पश्चातापाच्या भावनेमध्ये उपलब्ध नसते. याप्रकारे, विट्गेन्स्टाइन माणतात की पश्चातापाची भाशिक अभिव्यक्ति न केवळ अपर्याप्त, वरन्, अर्थहीन असते.

विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार, सगळे नैतिक आणि धार्मिक अभिव्यक्तिंमधे आपल्या भाषेचे दुष्प्रयोगाची एक निश्चित विशेषण असते.6 अशाप्रकारे विट्गेन्स्टाइन हे सिद्ध करतात की, 'शुभ', 'उचित', आणि 'मुल्यवान' जसे नैतिक सम्प्रत्ययांचा प्रयोग सामान्य अर्थामध्ये ज्या प्रकारे केला जातो त्यांचा तसा प्रयोग नीतिशास्त्रात केला जात नाही. उदाहरणासाठी, मूल्यवान जीवनाचा अर्थ मूल्यवान आभूशणापासून भिन्न असतो. असे म्हणणे की, मानवाचे जीवन किमती आहे, असे म्हणण्याने भिन्न आहे की आभूशण किमती आहे. अशाप्रकारे असे म्हणणे की, हा रस्ता चांगला आहे, असे म्हणण्याने भिन्न आहे की, अमुक व्यक्तीचा व्यवहार चांगले आहे.

विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार धर्म आणि नीतिशास्त्राच्या क्षेत्रामध्ये भाशा प्रतीकाचे कार्य करते. येथे भाषा हे कोणत्याही तथ्याचे वर्णन करत नाही तर कोणत्याही अशा सत्ताविषयी संकेत मात्र करतो की ज्याचा अस्तित्व या भौतिक जगतामध्ये नाही आहे. याचे कारण प्रतीक तर कोणत्या ना कोणत्या वस्तुचाच असतो. 'आणि समजा मी प्रतीकाच्या माध्यमाने कोणत्याही तथ्याचे वर्णन करतो तर मला प्रतीकाला सोडून, त्याच्या शिवाय तथ्याचे वर्णन करने योग्य पण झाले पाहीजे.'[7]

नैतिक मूल्यांची अनुभूतीची भाषीक अभिव्यक्तिला अर्थहीन माणताना विट्गेन्स्टाइन म्हणतात की, हि अर्थहीन अभिव्यक्ति यामुळे अर्थहीन नाही आहे कारण मला आता पर्यंत त्याची खरी अभिव्यक्ति सापडली नाही आहे, तर त्यांची अर्थहीनताच त्यांचे सारतत्त्व आहे. आता येथे प्रश्न पडतो की, जर हि अभिव्यक्ति वास्तवात नैतिक मूल्यांची वास्तविक अनुभूतीचे वर्णन करू शकत नाही, तर विट्गेन्स्टाइन त्यांचा उल्लेख का करतात?विट्गेन्स्टाइन म्हणतात की या अभिव्यक्तिंच्याद्वारे त्यांना महत्त्वपूर्ण भाशेच्या पलीकडे म्हणजेच जगताकडे संकेत करायचे होते. त्यांच्या मतानुसार,[8]

'माझी संपूर्ण प्रवृत्ती आणि माझा विश्वास आहे की अशा सर्व मनुष्यांची प्रवृत्ती, ज्यांनी नीतिशास्त्र आणि धर्माच्याविषयी बोलण्याचा प्रयत्न केला, हे भाषिक सीमेच्या विरूद्ध पळण्याचे आहे. आपल्या पिंजराच्या भिंतीच्या विरूद्ध आपली ही मजल, पूर्णपणे आणि निरपेक्ष रूपाने, निराशाजनक आहे. नीतिशास्त्र, जिथपर्यंत या जीवनाचे परमलक्ष्य, अर्थात, निरपेक्ष शुभ आणि निरपेक्ष मूल्यांविषयी काही म्हणण्याच्या इच्छेने उत्पन्न होते, कोणी विज्ञान होऊ शकत नाही असे जो म्हणतो तो कोणत्याही अर्थाने आपल्या ज्ञानात भर टाकत नाही.'

येथे विट्गेन्स्टाइनचे तात्पर्य असे आहे की, मूल्य ही भाषेची सीमा असते. याचे कारण असे की भाशा तथ्यात्मक असते, यामुळे ती मूल्यात्मक विषयांना व्यक्त करू शकत नाही. असे विट्गेन्स्टाइन यांचे नीतिविषयक विचार दिसून येतात.

## *निष्कर्ष* (Conclusion )

निष्कर्ष, असे म्हणता येईल की विट्गेन्स्टाइनने लेक्चर ऑन इथिक्स या निबंधात नीतिशास्त्राची भाषीक अभिव्यक्ती शक्य नसते असे प्रतीपादन केले आहे. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा प्रयत्नही केलेला आहे. तसेच हे स्पष्ट करून दाखविण्यासाठी त्यांनी सापेक्ष अर्थ व निरपेक्ष अर्थ या दोन अर्थांचा प्रयोगही केलेला आहे. , विट्गेन्स्टाइनच्या मते सापेक्ष मूल्यांचा निर्णय अंतिमतः तथ्यात्मक असते, तर निरपेक्ष मूल्यांना तथ्यात्मक असत नाही. तसेच, विट्गेन्स्टाइनच्या मतानुसार तथ्यांचा आणि तर्कवाक्यांचा संबंध सापेक्षिक मूल्य, थोडक्यात सापेक्षित शुभ आणि सापेक्षित उचिताशी असतो. ज्याच्या विषयी विचार करू शकतो किंवा ज्याच्या विषयी आपण काही बोलू शकतो ते नैतिक मूल्य असू शकत नाही. नैतिक अनुभूतीची भाषीक अभिव्यक्ति संभव नसते, अनुभव तथ्य असतात परंतु नैतिक अनुभूतीमध्ये कोणतेही तथ्य नसते असे विट्गेन्स्टाइन यांचे मत दिसून येते.

## *संदर्भ :*

1.वाडेकर, द. दे., 'मराठी तत्त्वज्ञान महाकोश खंडः 1', मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1974, पृ– 9.
2. विट्गेन्स्टाइन, लुडविग, 'लेक्चर ऑन इथिक्स', फिलोसॉफिकल रिव्यू, LXXIV, 1965, पृ– 5.
3. तत्रैव, पृ– 8–10.
4. तत्रैव, पृ– 8–9.
5. तत्रैव, पृ– 9.
6. तत्रैव, पृ– 9.
7. तत्रैव, पृ– 10.
8. तत्रैव, पृ– 11–12.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net